
22 MAR 2025

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**सरूड :** येथील श्री शिव-शाहू महाविद्यालयाच्या ४१ व्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# विद्यार्थ्यांनी वाचनाशी नाते दृढ करावे

## डॉ. डी. टी. शिर्के; सरूडला पारितोषिक वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

सरूड, ता. २१ : 'विद्यार्थ्यांनी वाचनाशी असलेले नाते अधिक दृढ करून अभ्यासक्रमाच्या पलीकडील जीवन समजून घ्यावे, तरच यशाच्या वाटेवरून चालता येईल', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील श्री शिव-शाहू महाविद्यालयाच्या ४१ व्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एच. टी. दिंडे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. रघुनाथ मुडळे यांनी केली. स्नेहसंमेलनप्रमुख डॉ. पी. बी. पाटील यांनी अहवाल वाचन केले.

पुढे बोलताना ते म्हणाले, 'तरुणांनी ग्रामीण भागात असलेल्या वेगवेगळ्या संधींचा फायदा घेऊन आपले कर्तृत्व सिद्ध करावे.' अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले, 'आपल्या ध्येय प्राप्तीसाठी आजच्या तरुणांनी सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून वाटचाल करावी.'

यावेळी संस्थेचे संचालक युवराज पाटील, गोकुळच्या माजी संचालिका अनुराधा पाटील, माजी प्राचार्य आय. बी. तांबोळी, माजी प्र. प्राचार्य बी. आर. गाडवे, डॉ. जी. बी. पाटील, डॉ. शिवकुमार सोनाळकर, प्रा. डी. आर. नांगरे, डॉ. के. ए. पाटील, प्रा. एल. टी. आरगे, प्रा. अशोक पाटील, मुख्याध्यापक जी. एस. पाटील, श्रद्धा इंगळे, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी प्राची घोलप, गजानन सातपुते, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. प्रकाश नाईक आणि प्रा. स्नेहल मेथे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विविध गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शा. शि. संचालक प्रा. प्रमोद कुचिवाले यांनी मानले.

22 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माध्यमांसाठी 'एआय' पूरक; पर्याय नव्हे!

## निखिल पंडितराव : विद्यापीठातील डिजिटल माध्यम उद्योग कार्यशाळेचा समारोप

कोल्हापूर, ता. २१ : 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) जगभर बोलबाला आहे. माध्यमांमध्ये हे तंत्रज्ञान स्वीकारणे अपरिहार्य आहे. तथापि, 'एआय' म्हणजे सर्वस्व नसून ते पूरक असेल, माध्यमांना ते पर्याय असू शकत नाही', असे मत 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांनी आज व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'डिजिटल माध्यम उद्योग' या दोनदिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'बी न्यूज'चे संपादक चारुदत्त जोशी होते.

श्री. पंडितराव म्हणाले, 'मुद्रित माध्यमांनी गेल्या पावणेतीनशे वर्षांमध्ये अनेक बदल केले आहेत. डिजिटल माध्यमांमुळे निर्माण झालेली आव्हाने पेलत आणि नवे बदल स्वीकारून वर्तमानपत्रे पुढे वाटचाल करत आहेत.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित डिजिटल माध्यम उद्योग कार्यशाळेचा समारोप 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव, 'बी न्यूज'चे संपादक चारुदत्त जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी डावीकडून सुमित पाटील, डॉ. नीशा मुडे-पवार, डॉ. शिवाजी जाधव आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

उलट कोविडनंतर वर्तमानपत्राच्या खपामध्ये आणि संख्येमध्ये वाढ झाली आहे. सामाजिक बांधिलकी, सत्याची कास आणि विश्वासार्हता जपत मुद्रित माध्यमांना वाटचाल करावी लागेल. डिजिटल माध्यमांच्या प्रभावामुळे काही प्रमाणात वर्तमानपत्रातील वृत्त सादरीकरणापासून आशयातही बदल झाले. मुद्रित माध्यम आणि डिजिटल माध्यम यांचा स्वतंत्र वाचक आणि ग्राहक आहे. ही दोन्ही माध्यमे स्वतंत्रपणे चालतील. या पुढील काळात वर्तमानपत्रांसाठी संशोधन, शोध पत्रकारिता आणि मानवी स्वारस्याच्या बातम्या दिल्याशिवाय गत्यंतर नाही.'

श्री. जोशी म्हणाले, 'टेलिव्हिजन पत्रकारितेमध्ये अनेक तांत्रिक बदल झाले आहेत. हे बदल स्वीकारणे अपरिहार्य आहे. सध्या देशभर बाराशेपेक्षा जास्त विविध चॅनेल्स आहेत. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे यातील अनेक चॅनेलवर परिणाम होताना दिसत आहे. डिजिटल माध्यम हेच टीव्हीकडे जाण्याचे भविष्यातील माध्यम असेल. विशेषतः मोबाईलच्या माध्यमातून मोठा वर्ग टीव्हीशी जोडला जाईल. केबल नेटवर्क कंपन्यांमध्ये अलीकडच्या काळात मनोमिलन सुरू असून स्पर्धा करण्यामध्ये त्यांना विशेष रुची उरलेली नाही.'

चित्रपट दिग्दर्शक सुमित पाटील म्हणाले, 'चित्रपट क्षेत्रापुढे आज अनेक आव्हाने आहेत. चित्रपटाच्या पायरसीमुळे निर्माते आणि दिग्दर्शकांची खूप मोठी आर्थिक हानी होऊ लागली आहे. डिजिटल माध्यमामुळे मोठ्या प्रमाणात आशयाची निर्मिती होत असली तरी चित्रपट माध्यमांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म फारसे फलदायी ठरले नसल्याचे दिसते.'

या कार्यक्रमास जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. विभाग प्रमुख डॉ. नीशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. चंद्रशेखर वानखेडे यांनी आभार मानले.

22 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानसंक्रमणात अनुवादित साहित्याची भूमिका महत्त्वाची

## डॉ. रघुनाथ ढमकले : अध्ययन साहित्याचे भाषांतर कार्यशाळेचे उद्‌घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

ज्ञानाच्या संक्रमणामध्ये अनुवादित साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात अध्ययन साहित्याचे भाषांतर या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे होते.

डॉ. ढमकले म्हणाले की, भाषांतर ही केवळ कला नसून ती सर्जनशील नवनिर्मिती असते. एका भाषेतील ज्ञान दुसऱ्या भाषेमध्ये नेऊन भाषेसह माणूस समृद्ध करण्याचे काम या माध्यमातून होते. अनुवाद प्रक्रियेमुळेच सामान्य माणसापर्यंत ज्ञान पोहोचू शकते. तर डॉ. कांबळे म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. चेतना सोनकांबळे यांच्यासह शिक्षक, संशोधक व विद्यार्थिनी.

बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय ज्ञानाच्या प्रसाराला महत्त्व देण्यात आले आहे. त्याचे योग्य उपयोजन करण्यासाठी अध्ययन साहित्य स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध होणे गरजेचे आहे.

शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ कार्यशाळेचे प्रयोजन स्पष्ट केले. प्रतिक्षा माने व दर्शना डोकरमारे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी सरस्वती कांबळे, आनंदा कुंभार, अर्चना कुराडे, अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, संजय चव्हाण उपस्थित होते. विद्यापीठ परिक्षेत्रातील शिक्षक, विद्यार्थी, संशोधक यांनी कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

तरुण भारत

# भ. महावीर अध्यासनासाठी एक लाखाची देणगी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास अधिविभाग प्रमुख तथा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. बी. डी. खणे यांनी भगवान महावीर अध्यासनासाठी एक लाख रुपयांची देणगी दिली.

भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन प्रस्तावित इमारतीसाठी एक लाख रुपयांच्या दातृत्वनिधीचा धनादेश डॉ. बी. डी. खणे यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे,

- डॉ. बी. डी. खणे यांनी यांच्याकडून देणगी

भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, डॉ. सचिन खणे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रल्हाद जाखले, अजित शेट्ये, विशाल शेट्ये उपस्थित होते. यावेळी डॉ. विजय ककडे यांनी भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारत बांधकामास लवकरच सुरुवात होत असून या कार्यासाठी सर्व अहिंसाप्रेमी आणि जैनधर्मीयांनी सढळ हस्ते देणगी द्यावी, असे आवाहन केले.

पुण्यनगरी



# भगवान महावीर अध्यासनासाठी लाखाची देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास अधिविभाग प्रमुख तथा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. बी. डी. खणे यांनी भगवान महावीर अध्यासनासाठी एक लाख रुपयांची देणगी दिली. हा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, डॉ. सचिन खणे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रल्हाद जाखले, अजित शेट्ये, विशाल शेट्ये उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थ्यांना योगशास्त्राचे धडे

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन केंद्रातर्फे एम. ए. योगशास्त्राचे विद्यार्थी आणि योग शिक्षकांसाठी दोनदिवसीय 'योग व मुद्रा' कार्यशाळा पार पडली. निलांबरी सभागृहात पीएम-उषा कॅपॅसिटी बिल्डिंग ऑफ पीजी स्टुडंट्स या योजनेअंतर्गत कार्यशाळा झाली.


मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते. संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी प्रास्ताविक केले. क्षितिजा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. डी. भालेकर यांनी हटयोगातील मुद्रांचे महत्त्व, जीवनशैलीशी संबंधित विकारांवर योगचिकित्सेचा प्रभावावर मार्गदर्शन केले. विजय शेटे यांनी चक्रध्यानावर व्याख्यान दिले. पंचकोश, चक्रांची महत्ता, त्यांचे जागरणाविषयी मार्गदर्शन केले. दीप्ती काळे यांनी मुद्रा, ध्यान, मंत्रयोग यावर मार्गदर्शन केले. यावेळी वाय. एस. बोकील, प्रीती चव्हाण, वीणा मालडीकर, उदय घाटे, रवींद्र खैरे, कानिफनाथ पंढरे उपस्थित होते.

22 MAR 2025

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी संख्या वाढीसाठी विद्यापीठाचा 'सोशल' प्रयत्न

कोल्हापूर, ता. २१ : कॅम्पसवरील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आता यू ट्यूब, व्हॉटस्अॅप आणि इन्स्टाग्राम या सोशल मीडियाच्या (समाज माध्यमांचा) माध्यमातून प्रयत्न करणार आहे.



उच्च शिक्षणाच्या संधी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान या पारंपरिक विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाने मान्यता दिली. त्यानंतर तीन ते चार वर्षांत या महाविद्यालयांमध्ये एम. ए., एम. कॉम., आणि एम. एस्सी अभ्यासक्रम सुरू झाले. त्याचा उलट परिणाम म्हणजे विद्यापीठ कॅम्पसमध्ये या अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटली. ही संख्या वाढविण्यासाठी विद्यापीठाने पदव्युत्तर प्रवेश समिती गठीत केली. या समितीने केलेल्या काही शिफारसी, सूचनांची अंमलबजावणी प्रशासनाने सुरू केली आहे.

विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश विभागाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. त्यात विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन प्रवेश अर्ज मागविले घेतले जात आहेत. याबाबत केंद्रीय प्रवेश समितीच्या बैठकीतील ठरावानुसार कॅम्पसवरील सर्व अधिविभागांनी त्यांच्याकडील विद्यार्थी प्रवेश क्षमता पूर्ण भरण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना विभागाची संपूर्ण माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना पदव्युत्तर प्रवेश विभागाने केली आहे. त्याबाबतचे परिपत्रक सर्व विभागप्रमुख, समन्वयक आणि संचालकांना आज पाठविण्यात आले आहे.